

गावडेवाडी (ता. आंबेगाव) : स्वीडनच्या एडिटा व्होकराल यांना फेटा बांधून गावकऱ्यांनी सवाद्य मिरवणूक काढली. अग्रभागी महिलांचे लेझीम पथक.
(छायाचित्र : डी. के. वळसे पाटील, मंचर)

# स्वीडनला रंगणार गावडेवाडीच्या गप्पा

## एडिटा व्होकराल : येथील एकत्र कुटुंबव्यवस्था पाहून आनंद

**मंचर, ता. १० :** "आदर्शगाव गावडेवाडी(ता. आंबेगाव)च्या विकासात महिलांचा असलेला सक्रिय सहभाग, येथील एकत्र कुटुंबव्यवस्था पाहून आनंद झाला. येथील महिलांचे कार्य आणि गावपण याविषयी स्वीडनच्या महिलांना सांगणार आहे. तेथील महिलांना भारतीय महिलांच्या जीवनाबाबत जाणून घेण्याची इच्छा आहे," असे स्वीडनच्या स्विस डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या एडिटा व्होकराल यांनी सांगितले.

महिला राजसत्ता आंदोलनाच्या वतीने येथे महिलांशी संवाद कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी व्होकराल बोलत होत्या. गावडेवाडीत लोकसहभागातून राबविलेल्या विविध कामांची पाहणी आज श्रीमती व्होकराल यांनी केली. त्या वेळी त्यांनी थेट महिलांबरोबर संवाद साधला. तुमच्या कामात पुरुषांचा पाठिंबा आहे का, मुलांच्या अभ्यासासाठी किती वेळ देता, तुमच्या कामात अडथळा आणला जातो का, शेतीमध्ये कोणती कामे करता, यापुढचे नियोजन काय, आदी प्रश्न व्होकराल यांनी उपस्थित केले.

"पुरुषांचा पाठिंबा व महिला आरक्षणामुळे गेल्या पाच वर्षांत येथे तीन महिलांना सरपंचपदावर काम करण्याची संधी मिळाली. ग्रामस्थांकडून प्रोत्साहन मिळते. मुलांना दर्जेदार इंग्लिश व संगणक शिक्षण मिळावे, असा आमचा प्रयत्न असतो. शक्य होईल तेवढा वेळ मुलांच्या अभ्यासासाठी देतो.

शेतीची कामे नियमित करतो. एकत्रित कुटुंब पद्धत आहे. कुटुंबामध्ये एकमेकांना सन्मानपूर्वक वागणूक दिली जाते. महिला चळवळ सक्षम करण्याचा आमचा निर्धार आहे," असे माजी सरपंच सौ. मनीषा गावडे, योगिता गावडे, शशिकला पिंपळे, योगिता जारकड, अर्चना गावडे, सारिका गायकवाड, ज्योती दहितुले, शीतल शिंदे, प्राजक्ता शिंदे यांनी श्रीमती व्होकराल यांना सांगितले. आत्मविश्वास व तळमळीने मनोगत व्यक्त करणाऱ्या महिला पाहून श्रीमती व्होकराल म्हणाल्या, "तुमचे धाडस व जिद्द वाखाणण्यासारखी आहे."

या वेळी शंकरराव पिंपळे, ज्ञानेश्वर गावडे या जोतिबापुत्रांचा व सरपंच मीना गावडे, मनीषा गावडे व महिला ग्रामपंचायत सदस्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. रिटा सरीन, प्रीता लाला यांची भाषणे झाली. सुनंदा मांदळे यांनी सूत्रसंचालन केले.

पाहुण्यांचे आगमन झाल्यानंतर मराठमोळ्या पद्धतीने बचत गटातील महिलांनी त्यांचे औक्षण केले. श्रीमती व्होकराल यांना फेटा बांधण्यात आला. गावातून त्यांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. अग्रभागी तासगाव येथील महिलांचे लेझीम पथक व हिरकणी विद्यालयाच्या विद्यार्थिनी होत्या. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट दिली. ग्रामसेवक बी.बी. चव्हाण यांनी लोकसहभागातून झालेल्या कामांची माहिती दिली.